**महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीयांच्या तसेच भटक्या जमातीतील यादीतील व विशेष मागास प्रवर्गातील काही जातींना वगळण्याबाबत आयोगाने केलेल्या शिफारशी नुसार वगळण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.२३२/मावक-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २ जून, २००४

वाचा - (१) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य , क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक : सीबीसी -१०९१/३०५/मावक-५, दिनांक १८ जाने, १९९३.

(२) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य , क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक : सीबीसी -१०९३/७४९२/प्र.क्र.२८/मावक-५, दिनांक १५ मार्च, १९९३.

(३) शासन निर्णय , समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य , क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक : सीबीसी -१०९३/७४९२/प्र.क्र.२८/मावक-५, दिनांक १५ मार्च, १९९३.

(४) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक : सीबीसी १०९४/प्र.क्र. २३६/मावक-५, दिनांक १३ जून, १९९५

(५) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक : सीबीसी १०९५/प्र.क्र. २८/मावक-५, दिनांक ९ ऑगस्ट, १९९५

(६) शासन निर्णय , समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य , क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक : सीबीसी -१०९३/७४९२/प्र.क्र.२८/मावक-५, दिनांक ३० जून, १९९७.

(७) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग क्रमांक : सीबीसी १२८९/२४५७०/प्र.क्र. ७९/इमाव-५ दिनांक २ ऑगस्ट, १९९९

(८) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, क्रामंकः सीबीसी १०९८/प्र.क्र.१८५/इमाव-५, दि. १ जानेवारी, २००१.

(९) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष, मागासप्रवर्ग कल्याण विभाग, क्रमांक : सीबीसी १०९८ / प्र.क्र. १८५ / इमाव-५, दि. १४ फेब्रुवारी, २००१.

(१०) शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.२३२/मावक-५, दिनांक १ जून, २००४

(११) शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.२३२/मावक-५, दिनांक १ जून, २००४

**प्रस्तावना** :-

इतर मागासवर्गात तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गात समावेश करण्याबाबतची प्राप्त झालेली निवेदने तपासणी करुन शिफारस करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाकडे पाठविण्यात आली. राज्य मागासवर्ग आयोगाने सन २०००-२००३ या कालावधीत एकूण १५१ जातीबाबत ५ अहवाल शासनास सादर केले. सदरच्या अहवालात इतर मागासवर्ग प्रवर्गात समाविष्ट करावे तसेच भटक्या जमातीच्या तसेच काही प्रवर्गात समाविष्ट करावेत तसेच काही जाती इतर मागासवर्ग, भटक्या जमाती व विशेष मागासप्रवर्गाच्या यादीतून वगळयाव्यात म्हणून शिफारस केलेल्या जातींच्या शिफारशींची तपासणी करुन त्यावर निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यावर सर्वंकष विचार करुन शासनाद्वारे भटक्या जमाती प्रवर्गाबाबत तसेच इतर मागासवर्ग प्रवर्गाबाबत निर्णय घेतला असून नव्याने समाविष्ट करावयाच्या भटक्या जमाती तसेच इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या यादीत तशी सुधारणा करण्याचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित केले आहेत. शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार त्यांचा आता नव्याने भटक्या जमाती प्रवर्गात समावेश करण्यात आला असल्यामुळे त्या जाती त्यांच्या इतर मागासवर्ग प्रवर्ग या मूळ प्रवर्गातून वगळणे तसेच भटक्या जमातीच्या यादीतून वगळण्याची शासनास शिफारस केली आहे. त्यानुसार शासन आता खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय** :-

महाराष्ट्र राज्याच्या इतर मागासवर्ग प्रवर्गात समाविष्ट असलेल्या खालील जातींचा समावेश भटक्या जमाती प्रवर्गात संदर्भाधीन अनुक्रमांक येथील शासन निर्णयान्वये नव्याने करण्यात आला असल्यामुळे या शासन निर्णयाद्वारे खालील जाती इतर मागासवर्गाच्या मूळ यादीतून वगळण्यास शासन मंजुरी देत आहे.

| अनुक्रमांक | यादीतील अनुक्रमांक | जातीचे नांव |
|---|---|---|
| १ | ४४ | गवळी |
| २ | १८० | डवरी |

या शासन निर्णयाद्वारे खालील जात इतर मागासवर्ग मूळ यादीतून वगळण्यास शासन मंजुरी देत आहे.

| अनुक्रमांक | यादीतील अनुक्रमांक | जातीचे नांव |
|---|---|---|
| १ | २६८ | माना |

या शासन निर्णयाद्वारे खालील जाती भटक्या जमातीच्या मूळ यादीतून वगळण्यास शासन मंजुरी देत आहे.

| अनुक्रमांक | यादीतील अनुक्रमांक | जातीचे नांव |
|---|---|---|
| १ | १ | सिंधी बावा |
| २ | २२ | ठाकर |

या शासन निर्णयाद्वारे खालील जात विशेष मागास प्रवर्गाच्या मूळ यादीतून वगळण्यास मंजुरी देत आहे.

| अनुक्रमांक | यादीतील अनुक्रमांक | जातीचे नांव |
|---|---|---|
| १ | २ | माना |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

( मुन्शीलाल गौतम )
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
मुख्य महानगर दंडाधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा दंडाधिकारी,
सर्व उप विभागीय अधिकरी ( महसूल)
तथा उप विभागीय दंडाधिकारी,
सर्व तालुका कर्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ - नागपूर,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ - नागपूर,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ- औरंगाबाद,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ - औरंगाबाद,
संचालक समाजकल्याण/ विजाभज, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, प्राथमिक शिक्षण ,महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,

सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे,
सर्व मंत्रालयीन विभाग,

**त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना हयाबाबतच्या सूचना द्याव्यात.**

सर्व विभागीय समाजकलयाण अधिकारी/ सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई/ मुंबई उपनगरे,
महा संचालक, माहिती व जनसंपर्क महा संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती, का- मावक-५